**नियमित दिवाणी दावा क्रमांक १२९०/२०१५**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१९२७-२०१५)

**<u>निशाणी क्रमांक ३९, ४२ व ४४ वरील संयुक्तिक आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. २ यांनी वादी क्र. १ श्रीरंग तुकाराम जाधव यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी जो विलंब झाला आहे तो माफ होवुन मिळावा तसेच त्यांच्याविरूद्ध झालेला उपशम (abatement) हा आदेश बाजुला सारून वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे अर्जांतील कथन थोडक्यात असे :- त्यांनी सदरचा दावा जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र.१ हे दि.११.०१.२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर कालावधीमध्ये कोरोना महामारी वाढलेली होती त्यामुळे देशात जमावबंदी व संचारबंदी लागु केली होती, त्यामुळे वादी क्र. १ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेणेकामी उशिर झालेला आहे, शिवाय त्यांच्याविरूद्ध दावा उपशम झालेला आहे. मयत वादी क्र.१ च्या वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे तसेच सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी त्यांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे व त्यांच्याविरूद्ध झालेला उपशम हा आदेश बाजुला सारून अर्जामध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी तसेच याकामी झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादींनी त्याच अर्जांवर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, सदर अर्ज दाखल करणेस वादीने एक वर्ष आठ महिणे चार दिवस इतका विलंब केला आहे व त्या विलंबाचे कारण नमुद केलेले नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले, तसेच दाखल कागदपत्रे पडताळुन पाहिली असता असे दिसुन येते की, वादी यांनी सदरचा दावा जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र.१ श्रीरंग तुकाराम जाधव हे दि.११.०१.२०२१ रोजी मयत झाले आहेत, त्यांना अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे वारस आहेत. सदर कालावधीमध्ये कोरोना प्रार्दुभाव वाढलेला होता, त्यामुळे न्यायालयीन कामकाज देखील संथ गतीने चालु होते ही बाब नाकारता येणार नाही. वादींनी मयत वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी जाणीवपुर्वक विलंब केला असे म्हणता येणार नाही. तरी परंतु कोरोना प्रार्दुभाव हा डिसेंबर २०२१ पर्यंत अटोक्यात आलेला होता अशा परिस्थितीमध्ये वादीने वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल करणे क्रमप्राप्त होते, परंतु त्यांनी सदरचा अर्ज दि. १५/०९/२०२२ रोजी दाखल केला आहे. सदरचा विलंब हा वादीने जाणीवपुर्वक केलेला नाही, परंतु विलंब झालेला आहे ही बाब नाकारता येणार नाही, त्यामुळे वादीवर खर्च लादुन अर्ज मंजुर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल

असे मला वाटते, सबब खर्च लादुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, त्या बाबतचा सविस्तर आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि.क्र.३९,४२ व ४४ वरील अर्ज रक्कम रूपये १,०००/- खर्च लादुन मंजुर करण्यात येत आहेत.

२. मयत वादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी जो विलंब झाला आहे तो माफ करून त्यांच्याविरूद्ध झालेला उपशम हा आदेश बाजुला सारण्यात येत आहे व त्यांचे अर्जांमध्ये नमुद केलेले वारस अभिलेखावर घेण्यात येत आहेत, तशी दुरूस्ती वादी यांनी वाद पत्रामध्ये सदर आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करण्याची आहे.

३. वादी यांनी उपरोक्त नमुद खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना देणे आहे.

Sangita Pundlik Babar
Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2022.12.06 15:14:05 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- ०५.१२.२०२२.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.